**मार्गदर्शक सुचना**
**शुध्दीपत्र**

जा.क्र.कृ.या.उ.अ./गुनि-५/मासू.(घ-३ व ४)/३८८/२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
Email ID – ddaqc5@rediffmail.com
दिनांक - ०२/१२/ २०१५

**प्रति,**

**१) जिल्हाधिकारी -------------------------------- (सर्व)**
**२) विभागीय कृषि सहसंचालक --------------------(सर्व)**
**३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ------------- (सर्व)**

विषय : **कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियानाअंतर्गत घटक क्र. ३ व ४ च्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ** : १. शासन पत्र क्र. कृयांउ-२०१४/प्र.क्र.१२४/४अे दिनांक १७/१०/२०१४
२. आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.कृ.या.उ.अ./गुनि-५/मा.सु.१५-१६/३८४/२०१५ दिनांक २६/११/२०१५

सन २०१५-१६ मध्ये कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत राज्यात राबविण्यात येत असलेल्या कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या घटक-३ व घटक-४ मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाच्या संदर्भिय पत्रानुसार निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

संदर्भिय शासन पत्र दिनांक १७/१०/२०१४ अन्वये सुचीत केल्यानुसार घटक-३ "कृषि यंत्र सामुग्री व उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य (कृषि औजारे/ उपकरणांचा अनुदानावर पुरवठा)" बाबत संदर्भिय दिनांक २६/११/२०१५ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार देण्यात आलेल्या जिल्हा निहाय भौतीक व आर्थिक लक्षांकाच्या अनुषंगाने स्थानीक परिस्थितीनुसार शेतक-यांच्या मागणीप्रमाणे औजारांचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने सदर घटकांतर्गत विविध बाबींच्या तालुकानिहाय/ उपविभागांतर्गत लक्षांकात बदल करण्याची सबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना मुभा देण्यात आली आहे. सदर बदल जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावेत. तथापि, सदर बदल प्रवर्गनिहाय मंजुर आर्थिक तरतुदीच्या मर्यादेतच करणे बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्याची.

तसेच घटक -४ "भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा सुविधा पुरविण्यासाठी कृषि औजारे बँन्केची स्थापना करणे" बाबत संबंधीत लाभधारकास त्यांच्या पसंतीप्रमाणे औजारे निवडीची मुभा राहील.

मात्र, सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रवर्गनिहाय मंजुर आर्थिक मर्यादेतच करणे संबंधीतांना बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी. दिनांक २६/११/२०१५ रोजी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांतील इतर बाबी जशाच्या तशा लागू राहतील.

**कृषि संचालक (नि. व गु.नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**

प्रत : माहीतीस्तव सविनय सादर -

१. **मा. अपर मुख्य सचिव,** कृषि व पणन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. **मा. आयुक्त कृषि,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
३. **मा. व्यवस्थापकीय संचालक,** महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादीत, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५

इ३३।५
२९८।५

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- कृयांउ-२०१४/प्र.क्र.१२४/४अे
कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक :- १७ ऑक्टोबर २०१४

दुरध्वनी क्र. ०२२-२२०२५४२६
फॅक्स क्र. ०२२-२२८१३३५०
E-mail : dsagriculture@gmail.com

**प्रति,**

**आयुक्त, कृषि**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य**
**पुणे – ४११ ००१**

**विषय : कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियानाअंतर्गत घटक क्र. ३च्या अंमलबजरवणीसाठी मार्गदर्शक सुचना वितरीत शासनाची मान्यता देणेबाबत.**

**संदर्भ : शासन पत्र क्र. :- कृयांउ-१०१४/प्र.क्र१२४/४अे दिनांक १० ऑक्टोबर २०१४**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाच्या संदर्भिय पत्रानुसार कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत घटक-३ च्या मार्गदर्शक सुचनांस शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

याबाबत दि. १७/१०/२०१४ रोजी साखर संकुल, पुणे येथे झालेल्या आढावा सभेत ठरल्यानुसार घटक-३ मधील विविध यंत्रसामुग्री व कृषि औजारांबाबत स्थानिक परिस्थितीनुरुप सदर घटकांतर्गत अंतर्भूत घटकांच्या भौतीक लक्षांकात अर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत बदल करण्याची मुभा संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना राहील. याबाबत क्षेत्रीय स्तरावर तात्काळ सुचना निर्गमीत कराव्यात.

तसेच, घटक-४ कृषि औजारे बँन्क बाबत मंजुर यादीतील कोणत्याही औजारांची निवड करण्याची संबंधीत लाभधारकास मुभा राहील याबाबत अंतर्भाव मार्गदर्शक सुचनांत करावा.

मात्र, कार्यक्रमाची अंमलबजावणी मंजुर अर्थिक मर्यादेतच करणे संबंधीतांना बंधनकारक राहील हे स्पष्ट करावे.

**(डॉ. सुधीर कुमार गोयल)**
**अपर मुख्य सचिव, कृषि व पणन**
**महाराष्ट्र शासन, मुंबई - ३२**

**प्रत :**

**कृषि संचालक (नि. व गु.नि.)** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ – यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीस्तव